**भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१८/२०१०**
**निशाणी क्र.३० खालील आदेश**

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.१ ने रेफरेन्स विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याबाबतची करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले.

०३. सामनेवाला क्र.१ व वकील गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जातील कथने त्यांचा युक्तीवाद म्हणून ग्राह्य धरण्यात आला. अर्जदार तर्फे विधीज्ञ प्रिती जंगम यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सामनेवाला क्र.१ चे कथन की, निवणुक कामकाज, न्यायालयीन कामकाज, कोविड कालावधी तसेच दिल्ली–मुंबई कॉरिडोरचे संपादनाच्या कार्यावाही व्यस्ततेमुळे प्रस्तुत प्रकरणात हजर होवुन कैफियत दाखल करता आली नाही. दरम्यान सामनेवाला क्र.१ विरुध्द रेफरन्स अर्ज विना कैफियत चालविण्याचा आदेश पारित झाला. शासना तर्फे कैफियत दाखल न झाल्यास शासनाचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. सबब, विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची व बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०५. अर्जदार तर्फे युक्तीवाद की, सामनेवाला क्र.१ ने दिलेले अर्जातील कारण हे खोटे व बनावट असुन ते संयुक्तीक नाही. सामनेवाला क्र.१ ने प्रकरणामध्ये विलंब होण्याच्या हेतुने मुद्दाम वेळेत हजर होऊन आपली कैफियत मांडली नाही. सबब, अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती केली.

०६. सामनेवाला क्र.१ व अर्जदारचे परस्पर विरोधी कथनाचे विवेचन करण्यात आले. मुळ अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १८ अन्वये भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.१ ने मुदतीत कैफियत न देण्याबाबत अर्जात दिलेली कारणे संयुक्तीक दिसुन येते. मुळ अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ ला बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.१ विरुध्दचा विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट रेफरन्स गुणदोषावर निकाली निघेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ विरुध्दचा रेफरन्स अर्ज विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

महाड
दिनांक ०८/०४/२०२४

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड